१८७५

म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २३७८

# स्मृति-तरंग

लेखक श्री.
चैतन्यानंद योगीराज
सोमनाथ.
[illegible]ा.
का[illegible]खानार.

REFBK-0022505
REFBK-0022505

२२३७४ काव्य
२२५०५
३०।११।७८
संदर्भ

**सरस्वति परमार्थ निकेतन**

१४२, गोपाळ नगर, डोंबिवली पूर्व.

● तिसरें–पुष्प ●

सन १९७५

# स्मृ ति - त रं ग

: लेखक :

चैतन्यानन्द–**सोमनाथ बाळशास्त्री क्षीरसागर**

: प्रकाशक :

चैतन्यानन्द–सोमनाथ बा. क्षीरसागर

१४२, गोपाळनगर, सरस्वति–निकेतन, डोंबिवली पूर्व.

: मुद्रक :

शं. द. घाटपांडे

जय-भारत प्रिंटिंग प्रेस, शिवाजी पथ, ठाणे.

**किंमत पांच रुपये**

# नित्य साधना

१) पहाटे ४ वाजतां उठणें. पहांटे ४ वाजतां उठणें कठीण नाही. त्यामुळें चैतन्यशक्ति व मन:स्वास्थ्य मिळते.

२) उठल्याबरोबर अंथरूणावर बसून आपल्या इष्टदेवतेची प्रार्थना मनोभावानें करणें. शरणांगती घेऊन प्रार्थना करणें, दहन नको, स्त्री नको, आयुष्य नको, स्वास्थ्य नको, फक्त तुझी भक्ति, निर्मळ भक्ति व सेवाशक्ति लागू दे. ही प्रार्थना.

३) शौच मुखमार्जन करून स्नान करणें.

४) त्यानंतर १० मिनिटे खालील आसनें करणें.

१) पद्मासन, योगमुद्रा, २) बद्ध पद्मासन ३) शशांगासन
४) भुजंगासन ५) शलभासन ६) धनुरासन ७) अर्धमत्स्येन्द्रासन
८) सर्वांगासन ९) पादहस्तासन १०) शवासन
एक, एक आसन एक एक मिनिट करणें.

५) प्राणायाम करणें १) सरळ प्राणायाम २) शितली ३) भ्रामरी ४) भस्त्रिका

६) १०८ गुरुमंत्र जप

७) इष्टदेवतेचा फोटो व त्राटक ध्यान

८) आजपाजय साधना

९) भजन, पूंजन साधनेला अत्यंत आवश्यक, यामुळे रोग नष्ट होतात. मानसिक आजार नाहींसा होतो. दुःखी जीव सुखी होतो. यामुळे समाधीची साधना लवकर घडतें.

१०) पठण : स्तोत्र पठण, इष्ट व गुरुदेवाला नमस्कार, नम्रता आणि पवित्रता हा भाव हृदयांत आवश्य ठेवावा.

११) ही साधना ४॥ ते ५॥ पर्यंत व्हावी, त्याचप्रमाणे रात्रीं झोपण्यापूर्वी गीता, उपनिषद योगग्रंथ याचें पठण करावें. १५ मिनटें आजपाजप करावा.

चैतन्यानंद

**सो. बा. क्षीरसागर**

२२३६४ काव्य
२२५०५
३०।११।५८
संदर्भ
मेर

## सरस्वति परमार्थ निकेतन

१४२, गोपाळ नगर, डोंबिवली पूर्व.

● तिसरें–पुष्प ●

सन १९७५

# स्मृति-तरंग

: लेखक :

चैतन्यानन्द–सोमनाथ बाळशास्त्री क्षीरसागर

: प्रकाशक :

चैतन्यानन्द–सोमनाथ बा. क्षीरसागर

१४२, गोपाळनगर, सरस्वति–निकेतन, डोंबिवली पूर्व.

: मुद्रक :

शं. द. घाटपांडे

जय-भारत प्रिंटिंग प्रेस, शिवाजी पथ, ठाणे.

किमत पांच रुपये

# स्मृति-तरंग




कला : भाई देशपांडे



श्री दुर्गापरमेश्वरी माता

ॐ



# अर्पण-पत्रिका

श्रीपरमेश्वरावर परिपूर्ण श्रद्धा, भक्ति व निष्ठा ठेवून, संसार सुखमय व व्यवस्थित करून भक्तिमार्गांत अनभिज्ञ राहून परम उच्च स्थान या भक्तिमार्गांत प्राप्त करून घेवून माझ्यावर पितृछाया व निष्काम, निर्लोभ व निरंतर प्रेम करून माझें जीवनांत उच्च परम-पद प्राप्त करून घेतलें असें माझें परम-प्रिय पितृ

भगवत्प्रेमी

श्रीयुत **नानासाहेब कुलक**

उर्फ

**रमाकांत गोविंद कुलकर्णी**, डोंबिवली

यांना माझा

## स्मृति–तरंग

समर्पण

आपला सर्वांचा सेवक,

**सो. बा. क्षीरसागर**

---

सोमनाथ म्हणे माझा स्मृति–तरंग
उफळून उठवील अंतरंग ॥

REFBK-0022505

[library stamp, illegible]

# माझी-स्मृति

स. न. वि. वि.

'स्मृति- तरंग' पुष्प तिसरें हें पुस्तक आज अक्षय्यतृतीया या दिवशीं प्रकाशित होत आहे म्हणून मला स्वतःला अत्यंत आत्मिक समाधान लाभत आहे.

'तरंग–वीणा, तरंग–बोल' हीं दोन पुस्तकें आपले सर्वांचे कृपाशिर्वादानें प्रकाशित झालेलीं आहेत व भक्तिभावनेनें प्रेमी–भक्त–जन फारच आवडीनें ह्या दोन पुस्तकांतील सुंदर सुंदर पदें व अभंग सर्रास गोड–गळ्यानें गात आहेत. प्रत्येक पुस्तक स्वयं–प्रेरणेनें व स्वयं–चलित भावनेनें रागदारींतून व अभंगांतून झालेलें आहे.

या दोन्ही पुस्तकांत छपाईंत वेळेच्या अभावीं कांहीं स्मरणीय चुका राहिलेल्या आहेत. त्या दुरुस्त करून घेतल्यास त्याचा संदर्भ बरोबर लागला जाईल. तरी कृपया सर्व प्रेमी–भक्त गणांनीं दुरुस्ती करून घ्यावी. ह्याबद्दल स्वतःला फारच दिलगिरी वाटत आहे.

तिसरें पुस्तक 'स्मृति – तरंग' हें छपाईंत अक्षरशः सज्ञानाकडून करेक्शन करून घेण्याचें करवीत आहोत. त्यांतूनही किरकोळ चुका दिसतील तर सर्वांनीं भावनेनें गोड करून दुरुस्त करून घ्यावेत, ही प्रार्थना.

'स्मृति – तरंग' हें पुस्तक दोन्ही पुस्तकांपेक्षां 'सरस' असें पुस्तक होत आहे. यांतील पदें 'अनुभविक – बोल' व 'स्मृति – बोल' म्हणूनच पदांतून दाखवलें आहे. कांहींकाळ भेदाला अनुसरून, कांहीं परिस्थितीला अनुसरून, कांहीं प्रेक्षणीय तीर्थक्षेत्रांचें वर्णन करून झालेलीं आहेत.

श्रीजगदंबेच्या कृपाशिर्वादानें, प. पू. श्रीसद्गुरु दादामहाराज हिंगे, व पूजनीय तीर्थस्वरूप कै. ब्रह्मश्री बाळशास्त्री रावजीशास्त्री क्षीरसागर, पुणें यांच्या स्फूर्तीनें जें वदवलें गेलें तेंच आपलेसमोर ठेवलें आहे. सेवा ही वृत्ती आहे व तीच कर्तव्यांतून पूर्ण करण्याचें चालवलें आहे. या कामीं 'सरस्वति परमार्थ निकेतन' मंडळांतील सदस्यांचें परिपूर्ण सहाय्य होत आहे. म्हणूनच स्फूर्तीनें सेवा करण्याची अंगीं शक्ति येत आहे. नामानिर्देश करणेंपेक्षां सर्वांनींच याचें श्रेय घेतलें आहे. व असेंच घेत राहून माझेकडून सेवा घडवून घेतील, हीच माझी प्रार्थना श्रीदुर्गापरमेश्वरी मातेजवळ आहे.

त्याचप्रमाणें हार्मोनियम व तबलावादन यासाठीं श्री. कमलाकर पांडे व श्री. सुधीर ग. मराठे यांचे अमोल सहाय्य होत आहे म्हणून त्यांचें हार्दिक शुभेच्छा मी श्रीमातेजवळ करीत आहे.

आपला सेवक,

चैतन्यानन्द **सो. बा. क्षीरसागर,**

डोंबिवली.

हृदयाचें दोन शब्द

# स्मृति

आज अक्षय्यतृतीया जीवनांतला महान दिवस. श्रीदुर्गा-परमेश्वरी मातेच्या मूर्तीस्थापनेचा पहिला वाढदिवस व त्या वाढदिवसाची आठवण म्हणून प. पू. अण्णांनीं 'स्मृति-तरंग' या पुस्तकाचें प्रकाशन ठेवलें आहे हा योगायोग नसून श्रीमातेचा संदेश आहे. 'स्मृति' म्हणजेच आठवण, म्हणून ही 'स्मृति' आपण सर्वांनीं अंतर्यामी ठेवूं या. कारण अशी 'स्मृति' असा 'ठेवा' मिळणें म्हणजे महद्भाग्य होय.

'स्मृति' ही 'स्मृति' आहेच पण त्यात 'चैतन्य' भरलेलें आहे. प. पू. श्रीसद्गुरु दादामहाराज, नागपूर, (प. पू. अण्णांचे श्री सद्गुरु) यांनी दिलेली 'चैतन्यानन्द' ही पदवी किती सार्थ आहे हें सर्व भक्तगण आजवर पाहत आहेत व आजच्या तिन्ही पुस्तकांचें प्रकाशनावरून स्पष्टच होत आहे.

जीवनांत 'आनंद' हा काय आहे हें दाखवून देणारे व 'चैतन्य' निर्माण करणारे माझे 'प. पू. सद्गुरु अण्णामहाराज' ऊर्फ

'चैतन्यानन्द' हे मूर्तीमंत 'चैतन्यच' आहे. प. पू. अण्णा इतक्या भूमिकेंतून दिसतात कीं, सर्व साधारण मानव आश्चर्यचकित होईल. कधीं वडिल, आई, सद्गुरु आणि साक्षांत 'सोमनाथ' जें भक्त त्यांच्याजवळ गेले, ज्यांच्यांत भाव निर्माण झाला त्यांनांच त्यांचें स्वरुप काय आहे हें समजलें. दुःखांत 'आनंद' निर्माण करण्याचें कौशल्य पाहून तर आश्चर्य वाटतें. किती तरी दुःखी माणसें प. पू. अण्णांजवळ येतात. दुःख निवारण झालें कीं, परत येत नाहींत, कार्याला मदत नाहीं, की, साधा भक्तिभावाचा, प्रेमाचा शब्द नाहीं असें बरेंच वेळां दिसून येते. पण प. पू. अण्णांचा 'आनंद' कायम तो कायमच. मी माझ्या कांहीं कामानिमित्त त्यांचेकडे गेलो होतों. मला पंधरा दिवसांत काम होईल म्हणून सांगितलें, व त्याप्रमाणे झालें, व मी त्यांचा मात्र कायमचा होवून बसलों. मला जें जें दिलें ते युगेयुगे तपें करूनही मिळणार नाहीं असें आहे. आज मी प. पू. अण्णांचा व प. पू. अण्णांचा मी मला जो परमानंद व परमसुख मिळवून दिलें त्याबद्दल मी कितीही जन्म घेऊन सेवा केली तरी तें फिटणार नाहीं. पण आतां जन्म नकोच. पाहिजे फक्त स्वामीजवळ कायम ही इच्छा.

तुम्ही कधीही प. पू. अण्णांजवळ जा. शांत वृत्ती, हांसरा व आनंदी चेहरा, भोळा स्वभाव असेंच तुम्हांला दिसतील. मन भक्तिभावनेनें व स्वच्छ ठेवा. दृष्टि निर्मळ ठेवा. प. पू. अण्णांबरोबर तुम्हाला सारी सृष्टि भक्तिभावनेनें ओथंबून भरलेली दिसेल.

प. पू. अण्णांचे भांडार सर्व खुलें आहे. ते नेहमीं म्हणतात, "मी द्यायला आलों आहे, तुम्ही घ्या, पण घेवून वाढवा. दुसऱ्यांना द्या. मिळवलेला आनंद सर्व स्वतःला न ठेवतां दुसऱ्यांना देवुन आनंदीत

करा व भांडार वाढवा. कधीही न संपणारा ठेवा ते आज आम्हांला देत आहेत हें कोणीही विसरूं नये. हाच ठेवा आपल्या जीवनाचा उद्धार करील. पण निःस्वार्थी, निर्व्याज भक्तिभावनेनें द्या व ठेवा घ्या."

आपलें सर्वांचें थोर भाग्य म्हणून प. पू. अण्णांसारखे थोर योगी पुरुष आपल्याला सद्गुरु म्हणून लाभले.

प. पू. अण्णांच्या मुखांतून जें आज काव्यरुपांत शब्द निघाले आहेत व निघत आहेत त्या प्रत्येक अक्षरांत अर्थ भरलेला आहे. भक्तिमार्गाचें महान् दर्शन आहे. खोलवर विचार करा व मनन करा मग सर्वांना कळेल कीं माझे स्वामी कोण आहेत ते.

आज आपल्या सर्वांच्याजवळ असल्याकारणानें आपल्याला तितकें महत्व कळत नाही. परंतु योगीपुरुष फार वेळ आपल्यांत रहात नाहींत व राहणार नाहींत कारण त्यांना फार मोठें कार्य करावयाचें आहे आणि त्याप्रीत्यर्थ त्यांना दूर दूर फिरावें लागणार आहे. त्यासाठीं ते आपल्यापासून दूर राहतील. जोपर्यंत जवळ आहेत तोपर्यंत त्यांच्या-जवळून मिळेल तें घेत चला व तुमचें देत चला.

आपला,

**श्री. दादासाहेब अणसूरकर,**

फामाटेक्स कं.,

डोंबिवली.



योगेश्वर शिवभक्त प. पू. श्रीसद्गुरु दादामहाराज हिंगे, नागपूर

# श्रीसद्‌गुरु-दर्शन

ताल-दादरा

घ्या दर्शन तुम्ही दर्शन तुम्ही जन हो।
श्रीसद्‌गुरु दादा मंदिरी आलें ॥ ध्रु ॥

मंदिरी त्यांचें वास्तव्य ठेवुनी।
भक्तगणी दर्शन घेवुनी।
कृपाशिर्वाद सकला घ्यावें ॥ १ ॥

शिवमय मूर्ती आनंदि हांसरी।
वात्सल्यमय पूर्णाधिकारी।
संकटी प्रसन्न करुनी घ्यावें ॥ २ ॥

श्रीसद्‌गुरुची भाव पूर्ण छाया।
जीव्हाळ्याची ती देवुनी माया।
जीवन सुख-शांतीमय करावें ॥ ३ ॥

अपुल्या आत्म्याची खूण घेवुनी।
जीव मोक्षाची वाट धरूनी।
डगमगती तारूं तारावें ॥ ४ ॥

जन्मोजन्मीची अपूर्व पुण्याई।
श्रीसद्‌गुरु चरणीं वाहुनी देई
सोमनाथ प्रार्थी शिवा मिळवावें ॥ ५ ॥

# महागणपती

ताल–त्रिताल

आदिदेवता महागणपती ।
बहु वंदिती प्रथम तुजला ॥ धृ ॥

ओंकाररुपी शरिराची कांती ।
शेंदूरमय सुंदर दिसती ।
गजमुखी म्हणुनी सजला ॥ १ ॥ महागणपती

आवड तुला बहु मोदकाची ।
पूजा विनायकी–संकष्टिची ।
सन्मान घेवुनी पावे भक्ताला ॥ २ ॥ महा०

लाल रंगी फूल, दुर्वा मस्तकी ।
कंठी रत्नमाला फार चकाकी ।
वाहन मूषक पुढें बैसला ॥ ३ ॥ महा०

विद्याधनाचा धारक म्हणती ।
सुखदुःखाचा तारक वदती ।
भक्तीभावानें तारीसी भक्ताला ॥ ४ ॥ महा०

सोमनाथ वंदितो गणराया ।
लवकरी धांव भक्ता ताराया ।
हीच प्रार्थना तुझे चरणाला ॥ ५ ॥ महा०



श्री चैतन्यानंद योगीराज सोमनाथ बा.क्षीरसागर ( ऊर्फ अण्णा ) महा

# तुळजापूर–दर्शन

ताल – केरवा

अहो या तुळजापूर गांवांत।
जमले भक्तगण अनंत।
चालतांना हो– बघतांना हो।
दिसे मला सगळे आईरुपांत ॥ धृ ॥

मराठी–गुजराथी-बंगाली।
सिंधि-कानडी-परदेसीवाली।
जवान जवान हो–वृद्ध बालगोपाल हो।
नाचती फिरती बहु थाटांत ॥ १ ॥

कल्लोळी–गायमुखी स्नान करिती।
'उदे उदे अंबे' गर्जना देती।
तीर्थी स्थान हो–भक्तगण करी हो।
भवानी आईला हांक देतात ॥ २ ॥

मंदिरी भक्तगण दर्शना येती।
खणानारळी पातळी सन्मान देती।
आई जगदंबेला हो–भवानी मातेला हो।
पूजा पाठ करूनी खेळ खेळतात ॥ ३ ॥

नवससायास बहु फेडिती।
गोंधळी गोंधळ घालीताती।
गोंधळी मंदिरी हो–आईला हांक देती हो।
भक्तांच्या इच्छेला हांक देतात ॥ ४ ॥

कांकड आरती शेजारती।
महापूजा आरती पंचारती।
नैवेद्याची घाई हो-प्रसादाची घाई हो।
पहावया मिळे रोज मंदिरात ॥ ५ ॥

सोंगट्या-पट डाव खेळांत
आई जाले भारती मठांत।
साक्ष पहाण्यास हो-दर्शन घेण्यास हो।
भक्तगण जाती भारती मठांत ॥ ६ ॥

निसर्गसृष्टिच्या सौंदर्यात।
'घाटशीळा आहे साक्षांत।
जाता येता हो-सुंदर देखावा हा।
पाहण्यास मिळे तुळजापुरांत ॥ ७ ॥

वास तुझा हा चौदाभुवनी।
दर्शन देई तुळजाभवानी।
पावन करी हो-तारी तारी हो।
संकटी भक्तांना तारते बहुत ॥ ८ ॥

सोमनाथ आला तुळजापुरांत।
भक्तगण घेवुनी दरबारांत।
प्रार्थना आईस हो-सांकड आईस हो।
रक्षण करुनी घेई दंडवत ॥ ९ ॥

# भजन-पूजन

ताल-केरवा

तुम्ही याहो याहो भजनाला ।
शांती-सुखाच्या पुण्यायीच्या ।
पवित्र मार्गाला ॥ धृ ॥

सुलभ शांतीचा मार्ग सुखाचा ।
आयुष्याच्या सुखसमृद्धिचा ।
जीवा-शिवाच्या मीलनाला ॥ १ ॥ याहो०

नाहीं लागते कांहींच देवा ।
पैसा अडका धनाचा ठेवा ।
शुद्ध प्रीतीच्या भावभक्तीला ॥ २ ॥ याहो०

निष्काम भक्तींत करा भजन ।
मनोभावानें सदा पूजन ।
निःशंकपणें या प्रेम भावाला ॥ ३ ॥ याहो०

धकाधकीच्या पर्व-कालांत ।
माणुसकीच्या पवित्र भावांत ।
निर्लोभ वृत्तीच्या या मार्गाला ॥ ४ ॥ याहो०

संसाराच्या अनिष्ट प्रवाहांत ।
दारिद्र्य दुःखाच्या भयभीतींत ।
तारील तुमच्या या वृत्तीला ॥ ५ ॥ याहो०

कलियुगाच्या महाकालांत ।
भजन-पूजन साध्य भक्तींत ।
साध्य होईल येवुनी भजनाला ॥ ६ ॥ याहो०

सर्व साधनांत श्रेष्ठ ही भक्ति।
भजन–पूजन सहज प्रवृत्ति।
सहज जिंकील आत्मोद्धाराला ॥ ७ ॥ याहो०

भक्तीमार्गाचें सुलभ साधन
भजन पूजनानें साध्य करून।
सोमनाथ सांगे मिळवा शक्तीला ॥ ८ ॥ याहो०

❖ ❖ ❖

# साथ

अभंग

कां न तूं धरिसी देवाचा तो साथ।
व्यर्थ चालविसी जीवनाचा रथ ॥ धृ ॥

जीवनी येवुनी काय बा तूं केलें।
आत्मोद्धार मूळ वाया घालविलें ॥ १ ॥

नाहीं कामा येती गणगोत सारे।
स्वार्थी-लोभासाठीं जमतील द्वारें ॥ २ ॥

निंदा तैशी स्तुती बहु करतील।
नफा-तोटा ठायीं जमे धरतील ॥ ३ ॥

ऐशापरी भार काय कामा येई।
जन्ममरणाचा भार पुन्हा घेई ॥ ४ ॥

योगी-जपी-तपी-साधु आणि संत।
करी उपदेश सर्वांचे जीवांत ॥ ५ ॥

अनुभव सांगे दास सोमनाथ।
जीवनांत ठेवा देवाचा तो साथ ॥ ६ ॥

❖ ❖ ❖

# ठेवा

अभंग

कोणी कांहीं म्हणा तूंचि माझा ठेवा।
दिसे मला सदा माझ्या मनोभावा ॥ धृ॥
जन्मोजन्मीचा मी ऋणी आहे शिवा।
करूनीया घ्यावी गोड माझी सेवा ॥ १ ॥
अज्ञानपणांत नाहीं कळे हेवा।
सांवरूनी घ्यावें हाच माझा दावा ॥२ ॥
दरबारी आलो घेवुनीया भावा।
चरणीं ठेविले माझ्या प्रेमभावा ॥ ३ ॥
मन माझें गेलें रंगुनीया शिवा।
भान ना राहीलें हाच माझा ठेवा ॥ ४ ॥
रंगुनी रंगला सोमनाथ शिवा।
देवुनीया गेला जीवनाचा ठेवा ॥ ५ ॥

# माझा आधार

ताल — केरवा

तूं जीवनाचा आधार।
करितो प्रेम अनिवार ॥ धृ॥
तूंच माझ्या आहे देव्हारी।
मीच तुझा प्रेमपुजारी।
भवसागर करीन पार ॥ १ ॥

जीवन माझें तुज वाहिलें।
संचितानें तुज आर्पिलें।
हृदयी घेवुनी दे आधार ॥ २ ॥

नाहीं कोणी जगती मजला।
तूंच माझा सर्वस्वी उरला।
देवुनी जीव्हाळा मज फार ॥ ३ ॥

दिवास्वरूपी राही तूंच।
उजाला त्याचा आहे मीच।
त्यावीण कसें जगणार ॥ ४ ॥

फार दिसांची मनीषा होती।
तृप्त होईल आतां वृत्ती।
जाणुनी अपुला आत्मोद्धार ॥ ५ ॥

अशा स्वरुपी माझी विनंती।
ठेवी शिवा अवती-भवती।
हाच सोमनाथाचा आधार ॥ ६ ॥

❖ ❖ ❖

## भूल

ताल-केरवा

काय भूल पडली मजला। देवुनी दिलें सगळे तुजला ॥ धृ ॥

तन-मन-धन अर्पुनिया। अर्पण केली माझी काया।
आनंद झाला माझे जीवाला ॥ १ ॥ देवुनी०

भार जीवाचा टाकुनी दिला। मोहापायी जीव मुक्त झाला।
जीव-शिव एकच झाला ॥ २ ॥ देवुनी०

जलाचा बिंदु सिंधूंत गेला । एकस्वरुपी पूर्ण झाला ।
माझें म्हणाया क्षण ना उरला ॥ ३ ॥ देवुनी०

कापुरी ज्योत कापुरी गेली । कांहीं नाहीं अंगीं उरली ।
जीवाशिवाचा भाव दिसला ॥ ४ ॥ देवुनी०

होते नव्हते सारे जीवनी । मोकळा झालो आतां देवुनी ।
जीवनाचा उद्धार झाला ॥ ५ ॥ देवुनी०

सोमनाथाचा धांवा जनाला । देवुनी द्यावें भगवंताला ।
हचि प्रार्थना भक्तजनाला ॥ ६ ॥ देवुनी०

## सच्चिदानंद

राग–मालकंस ताल–त्रिताल

नको विसरूं त्या भगवंताला ।
जन्मोजन्मीचा साथी तुजला ॥ धृ ॥

संकटी आपत्तींत असतां ।
दारिद्र्य-दुःख भोगीत चलता ।
तारील तोचि आपणाला ॥ १ ॥

निसर्ग सृष्टिचा जगत्पालक ।
सुखदुःखाचा भावी नियोजक ।
तारक–मारक हाचि अपुला ॥ २ ॥

तेलावीण दीप नाहीं राहत ।
भगवंतावीण जीव नाहीं जगत ।
'सच्चिदानंद' सारे जणाला ॥ ३ ॥

जीव्हाळ्याच्या भक्तिभावांत ।
तोचि दिसेल आत्मरुपांत ।
देई सुखशांति मनाला ॥ ४ ॥

सोमनाथ करी जागृत जनाला ।
सोडूं नको त्या भगवंताला ।
हीच प्रार्थना भक्तगणाला ॥ ५ ॥

❖ ❖ ❖

## सखा -- जीवलग

ताल - केरवा

जयाचें मुखी सदा रामनाम ।
तोचि साधेल अपुलें काम ॥ धृ ॥

जीवन जगणें रामावांचून ।
सुवर्ण नसे परिसावांचून ।
हीच गती राही निजधाम ॥ १ ॥ तोचि०

रामासारखा सखा जीवलग ।
नाहीं मिळेल शोधून जग ।
भूत - भविष्य - प्रारब्धी राम ॥ २ ॥ तोचि०

जीवाच्या जीव्हाळ्याचा तो एकला ।
साथी सोबत राही जीवाला ।
सोमनाथ सांगे मिळवा हा राम ॥ ३ ॥ तोचि०

❖ ❖ ❖

# दया-माया

अभंग

दया-माया असें ज्याचें हृदयांत।
तोचि दिसे मला पूर्ण साधुसंत ॥ धृ ॥
जीवनांत दया आल्यावीण कांहीं।
मानवाचा जन्म उपयोगी नाहीं ॥ १ ॥
दयेच्याच पोटीं माया स्थीर करी।
दोघांची सांगड जमेस ती धरी ॥ २ ॥
प्रतिभा-संपन्न जीवन जगण्या।
दया-माया ठेवी वास्तव्य धरण्या ॥ ४ ॥
योगी-साधू-संत ऋषी मुनी जन।
दया-मायेच्याच पोटी झाले जगी धन्य ॥ ४ ॥
दया-माया पोटी मानवाची कीर्ति।
ठेवा जीवनांत कराया प्रगती ॥ ५ ॥
सोमनाथ सांगे साफल्य जीवन।
दया-माया ठेवा करण्या साधन ॥ ६ ॥

❖ ❖ ❖

# षडाक्षरी-मंत्र

ताल – त्रिताल धृप

मम शिवा सुखवाया येई तूं मला ॥ धृ ॥
केविलवाणी स्थिती घडे मला।
झणी येवूनी संभाळी मजला ॥ १ ॥

ध्यास मनाला एकच जडला ।
स्वरूप पाहण्या तुज लागला ॥ २ ॥

निशिदिनी प्रार्थितो तुजला ।
नमःशिवाय षडाक्षरी-मंत्राला ॥ ३ ॥

कांहीं सुचेना-रुचेना मजला ।
केव्हां भेटशील घोर जीवाला ॥ ४ ॥

जिवाशिवाच्या उत्सुक भेटीला ।
सोमनाथ प्रार्थी शिवा तुजला ॥ ५ ॥

❖ ❖ ❖

## आसरा

ताल–दादरा

लवकरी धांव अंबाई । किती पाही अंत आतां ।
जीव होई फार घाबरा ॥ धृ ॥

सुचत कांहीं नाहीं मजला ।
हुरहुर लागे मनाला ।
पाहण्या जीव झाला बावरा ॥ १ ॥

स्वप्नी येई मज न कळत ।
हांक देसी हळूंच धांवत ।
म्हणूनी जीव होई कावरा ॥ २ ॥

सालंकृत दर्शन घडते ।
वृत्ती हांसरी मज दिसते ।
बावरी वृत्ति माझी सांवरा ॥ ३ ॥

धीर देवुनी शांत तूं करी ।
दर्शन देवुनी भक्ता तारी ।
सोमनाथासी द्यावा आसरा ॥ ४ ॥

❖ ❖ ❖

## तमन्ना

ताल–त्रिताल

मंदिरी आलों तुझ्या दर्शना ।
पावन करी तूं दयाघना ॥ धृ ॥
काय करावें कसें वदावें ।
कवण्या रूपें आवाहनावें ।
समजुनी द्यावी कामना ॥ १ ॥
पूजापाठ विधि नाहीं जमे ।
जप-तप-व्रत नाहीं उगमे ।
सांगुनी द्यावी हीच साधना ॥ २ ॥
शास्त्र-पुराणाची नाही गती ।
वेदपठणाची नाही मती ।
माझे जीव्हाग्री नाही रसना ॥ ३ ॥
एक मज ठावे माझा देव ।
पाहुनी रमतो माझा भाव ।
पूर्ण करावी हीच तमन्ना ॥ ४ ॥
भावाचा तूं देव मी भावाचा ।
भावानेंच होशी तूं अमुचा ।
सोमनाथ करी ही प्रार्थना ॥ ५ ॥

❖ ❖ ❖

# जगदंबा

ताल – त्रिताल

नमन तुला जगदंबा ।
ठेवी मस्तक तुझे पाया ॥ ध्रु ॥

त्रिभूवनाची तूं स्वामिनी ।
भक्तजनांची तूं जननी ।
घेई धांव रक्षावया ॥ १ ॥

असूरांचा घेशी बली ।
सज्जनांची होशी वाली ।
नवदुर्गाची ठेवी छाया ॥ २ ॥

काली लक्ष्मी सरस्वती ।
भक्त जन सदा वंदती ।
दिससी अवतारी माया ॥ ३ ॥

अष्टभुजा अष्ट दिशासी ।
सज्ज राहसी रक्षणासी ।
पूजा पाठ जप कराया ॥ ४ ॥

चैतन्यमय तुझी मूर्ती ।
भक्तजन प्रसन्न होती ।
नम्र होती तुझे पाया ॥ ५ ॥

तुझ्या चरणी सोमनाथ ।
तुझ्यावीण सदा अनाथ ।
प्रार्थी तुझे चरणी लागाया ॥ ६ ।

# श्री मंगेशा

ताल – त्रिताल

वंदूया प्रथम श्रीमंगेशा ।
गोमंतकी माझ्या महादेवा ॥ धृ ॥

तेजःपुंज स्वयंभू प्रतिमा ।
गंध-पुष्प-बेलांचा महिमा ।
भक्त अर्पिती चरणी देवा ॥ १ ॥

गळी नाग भूषण तो खेळे ।
रुद्राक्षमाळा अंगी लोळे ।
भस्मचर्चित मूर्ती देवा ॥ २ ॥

दूरदूरचे भक्त तुझे येती ।
पुजापाठ अभिषेक करिती ।
लोटांगणें घाली तुज देवा ॥ ३ ॥

पालखीची भव्य मिरवणूक ।
भालदार-चोपदार आणिक ।
प्रदक्षिणा सोमवारी देवा ॥ ४ ॥

सोमनाथ आला तुझे दरबारी ।
घेवुनी प्रेमभाव अंतरी ।
ठेवी कृपा सर्वावरी देवा ॥ ५ ॥

❋ ❋ ❋

# काहूर

राग – भैरवी

अजि मम ध्यास मनी लागला ।
अंतरी काहूर माझ्या उठला ॥ धृ ॥

जीवन होई शुष्क देवा ।
नाहीं घडली तुझी सेवा ।
व्यर्थ जन्म लाभे मजला ॥ १ ॥

जन्मा येवुनी काय केलें ।
संचिताचें मुद्दल गेलें ।
नाहक पाप या जीवाला ॥ २ ॥

तुजवीण कैसे जीवन जगणें ।
धिःकारतील ऐसें जीणें ।
मानवावीण पशु भला ॥ ३ ॥

नाम मुखी सदा वदावें ।
शिवा अपुलासा करावें ।
तोचि जन्म जाई मोक्षाला ॥ ४ ॥

सोमनाथ हा प्रार्थी देवा ।
आधार तूंचि जगा जीवा ।
संभाळून घ्यावें सकला ॥ ५ ॥

❖ ❖ ❖

# संसार

अभंग

नको करू चिंता । संसाराची आतां ।
घडोघडी घडे । जन्म पुन्हां घेतां ॥ धृ ॥
संसार साधण्या । आहेसी तत्पर ।
जन्माची ती खोड । कधीं होई दूर ॥ १ ॥
आपण तरला । नव्हे हा संसार ।
स्वार्थासाठी करी । देहाचा प्रचार ॥ २ ॥
दुसऱ्यासी तारी । हाचि जगी भला ।
संसारी राहुनी । नेटका तरला ॥ ३ ॥
मानवाचा जन्म सेवेसाठी आला ।
देवाचा संसार । करण्या जन्मला ॥ ४ ॥
पशुपक्षी प्राणि । संसार करती ।
श्वानापरी होई । मानवाची गती ॥ ५ ॥
संसार करुनी । परमार्थ करी ।
पुण्याचा तो धनि । जीवन उद्धरी ॥ ६ ॥
नसावा तो ओढा । संसाराचें साठी ।
अधोगती नेई । चिंतेच्याच गाठी ॥ ७ ॥
गती-अधोगती । मानवाचे हाती ।
धरुनी विवेक । टाळावी आपत्ती ॥ ८ ॥
सोमनाथ सांगे । संसारी राहूनी ।
परमार्थ करी । मोक्षाचा तो धनी ॥ ९ ॥

# भक्तीचें वर्म

अभंग

न सोडावा धर्म । न सोडावें कर्म ।
भक्तीचें जाणावें । पूर्ण तुम्ही वर्म ॥ धृ ॥

साधन सामुग्री । संतांचें जवळी ।
आत्मसात त्यासी । करुनी आवळी ॥ १ ॥

निश्चय करुनी । दृढ एकचित्ती ।
टाळावी जीवनी । संसारी आपत्ती ॥ २ ॥

ज्ञानावीण कर्म । कर्मावीण ज्ञान ।
भक्तीमार्ग कैसा । होईल पावन ॥ ३ ॥

आवडीनें घ्यावें । देवाचें तें नाम ।
सान्निध्य करुन । संत समागम ॥ ४ ॥

ज्ञान आणि कर्म । दोन्ही तें साधून ।
भक्तीची दुर्बिण । पाहावी लावून ॥ ५ ॥

न होता आधीर । धरोनीया धीर ।
एकचित्त पूर्ण । करोनिया स्थीर ॥ ६ ॥

ध्यान तें करुनी । पाहावें निक्षून ।
दिसेल तुम्हासी । आत्म्याची ती खूण ॥ ७ ॥

सोमनाथ सांगे ! भक्तीचें तें वर्म ।
धरावें चरण । संतसमागम ॥ ८ ॥

# जादुगिरी

अभंग

तुझी जादुगिरी । देवा झाली मला ।
वेड हें अंतरी । लागलें मनाला ॥ धृ ॥

अन्न-पाणि कांहीं । रुचेना जीवाला ।
तैसी निद्रा नाहीं । भोळ्या या मनाला ॥ १ ॥

तुझ्या या नामाचा । प्रताप घडला ।
देहभान जाधी । पाहुनी तुजला ॥ २ ॥

जीथें पाही तीथें । दिसे तूंच मला ।
रोमरोमांतूनी । अंतरी भिडला ॥ ३ ॥

शब्द वाणींतूनी । नाहीं तो सरला ।
एक रूपतेंत । लय तो पावला ॥ ४ ॥

माझें म्हणावया । अंश ना उरला ।
आत्मस्वरुपांत । तुझ्या समावला ॥ ५ ॥

तुझ्या-माझ्या रुपा-भेद ना उरला ।
जादु हीच झाली । माझ्या या जीवाला ॥ ६ ॥

सोमनाथ सांगे । अस्तित्वामधला ।
भाव हा तरला । जीवाशिवांतला ।

ग्रंथ संग्रहालय ठाणे
२३५८ काव्य
दा. क्र.
२२५०४
संग्रह शाखा



# श्रद्धारती

ताल – केरवा

अपराधाची क्षमा आतां झाली पाहिजे ।
देवा झाली पाहिजे ।
अबोध सुबोध गुण वर्णिले तुझे ॥ धृ ॥

नाहीं ताल, नाहीं टाळ, नाहीं मृदुंग ।
देवा नाहीं मृदुंग ।
वेडेवांकुडे बोल गाईले तुझे ॥ १ ॥

भावभक्तीची माझी भोळी पूजा ।
देवा भोळी पूजा ।
तन - मन - धनी चरणी वाही तुझे ॥ २ ॥

माझ्या पंचप्राणाची पंचारती ।
देवा पंचारती ।
ओवाळीली तुला मी स्वरूपी माझें ॥ ३ ॥

गोड मानुनी भक्तांची आरती ।
देवा श्रद्धेची आरती ।
सोमनाथ ठेवी देवा चरणी तुझे ॥ ४ ॥

❖ ❖ ❖



माझे पूज्य तीर्थस्वरूप कै. ब्रह्मश्री वे. शा. सं. **बाळशास्त्री रावजीशास्त्री क्षीरसागर**

# नित्य षोडशोपचार पूजा-विधि

हल्लींच्या दुर्मिळ व परिस्थित्यनुरुप " षोडशोपचार पूजा–विधि " करणेंस पुरोहित–वर्ग न मिळालेनें अनेक श्रद्धायुक्त यजमानांची फारच कुचंबणा होत आहे. शेवटीं नाईलाजानें कसें तरी 'संस्कार असतात' म्हणून पूजा–विधि घरचें घरीं करून घेतात व समाधान मानून घेतात. अर्थांत भोळेजनांची अंधश्रद्धा पाहून भगवंत पावन करून घेतात ही गोष्ट निराळी. परंतु खरेंखुरें आत्मिक समाधान न लाभलेमुळें बरेंच असंतुष्ट होतात.

केवळ यासाठींच " षोडशोपचार पूजा–विधि " तांत्रिक पद्धतीनें या " स्मृतितरंग " पुस्तकांत मराठी अर्थासहित दिलेले आहेत. तरी तें भक्तगणांनीं २–३ वेळां पठण केलें असतां हेंच " षोडशोपचार पूजा–विधि " चें उत्कृष्ट समाधान मिळेल व कृतकृत्य वाटेल. खालील विधीप्रमाणें "पूजा- विधि " आहे.

साहित्य :—

हळद, कुंकू, रांगोळी, उदबत्ती, कापूर, विड्याचीं पानें, सुपारी, फळ, नारळ, अभीर, फुलें, बेल, हार, वेणी, सुगंधी अत्तर, पंचामृत, गोमुत्र, साखर, गूळखोबरे, अक्षता, पेढे इत्यादि.
उपकरणीं :— पळी, पंचपात्र, ताम्हण, कलश, निरंजन, उदबत्तीचें घर, पाट अगर आसन इत्यादि.

दररोज नित्य स्नान करून व धूत वस्त्र नेसून संध्या व नमस्कार

करणें. त्यानंतर देवपुजेसाठीं भक्तियुक्त अंत:करणानें पाटावर बसून देवपूजा करणेंस प्रारंभ करावा. वरील साहित्य जवळ घ्यावें.

पंचायतन शिवपंचायतन, विष्णूपंचायतन, श्रीदेवीपंचायतन,

श्रीदुर्गापरमेश्वरी पंचायतन.











वरीलप्रमाणें जें पंचायतन पाहिजे असेल तें मांडून घ्यावें. फक्त मधोमध मुख्य देवता ठेवली कीं तें त्याचें पंचायतन झालें.

प्रथम आसनावर बसून ‘ **केशवाय नमः नारायणाय नमः माधवाय नमः** ’ अशी तीन नांवें घेवून प्रत्येक वेळी पळीनें उजवे हातावर पाणी घेवून आचमन–प्राशन करावें व ‘ **गोविंदाय नमः** ’ म्हणून पळीनें पाणी ताम्हणांत सोडावे. नंतर नमस्कार करीत म्हणावें.

**विष्णवे नमः मधुसूदनाय नमः त्रिविक्रमाय नमः वामनाय नमः श्रीधराय नमः हृषीकेशाय नमः पद्मनाभाय नमः दामोदराय नमः संकर्षणाय नमः वासुदेवाय नमः प्रद्युम्नाय नमः अनिरूद्धाय नमः पुरूषोत्तमाय नमः अधोक्षजाय नमः नारसिंहाय नमः अच्युताय**

नमः जनार्दनाय नमः उपेंद्राय नमः हरये नमः श्रीकृष्णाय नमः म्हणून पुन्हां पाणी ताम्हणांत सोडावें.

प्रणवस्य परब्रम्हऋषिः परमात्मा दवता दैवी गायत्री छंदः प्राणायामे विनियोगः

म्हणून पळीभर पुन्हा पाणी सोडावे व गायत्री मंत्र ३ वेळां म्हणून प्राणायाम करावा.

ॐ भूर्भुवस्वः तत्सवितुर्वरेण्यं भर्गोदेवस्य धिमही धियोयोनः प्रचोदयात.

नंतर उजव्या हातांत पळीत पाणी घेवून त्यांत गंधाक्षता घालून व उजवे हातांत पळी धरून संकल्प मंत्र म्हणावा —

श्रीमन्महागणाधिपतये नमः ॥ गुरुभ्यो नमः ॥ सरस्वत्यै नमः॥ वेदाय नमः ॥ वेदपुरुषाय नमः ॥ इष्टदेवताभ्यो नमः ॥ कुलदेवताभ्यो नमः ॥ स्थानदेवताभ्यो नमः ॥ ग्रामदेवताभ्यो नमः ॥ वास्तुदेवताभ्यो नमः ॥ लक्ष्मीनारायणाभ्यां नमः ॥ उमासहेश्वराभ्यां नमः ॥ शचीपुरंदराभ्यां नमः ॥ मातापितृभ्यां नम ॥ आदित्यादिनवग्रहदेवताभ्यो नमः ॥ एतत्कर्मप्रधानदेवताभ्यो नमः ॥ सर्वेभ्यो देवेभ्यो नमः ॥ सर्वेभ्यो ब्राह्मणेभ्यो नमोनमः ॥ अविघ्नमस्तु ॥ सुमुखश्चैकदंतश्च कपिलो गजकर्णकः ॥ लंबोदरश्च विकटो विघ्ननाशो गणाधिपः ॥ धूम्रकेतुर्गणाध्यक्षो भालचंद्रो गजाननः ॥ द्वादशैतानिनामानि यःपठेच्छुणुयादपि ॥ विद्यारंभे विवाहेच प्रवेशे निर्गमे तथा ॥ संग्रामे संकटे चैव विघ्नस्तस्य न जायते ॥ शुक्लांबरधरं देवं शशिवर्णं चतुर्भुजं ॥ प्रसन्नवदनं ध्यायेत्सर्वविघ्नोप्रशांतये ॥ सर्वमंगलमांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके ॥ शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणि नमोस्तुते ॥ सर्वदा सर्व कार्येषु नास्ति तेषाममंगलम् ॥ येषां हृदिस्थो भग-

वान्मंगलायतनं हरिः ॥ तदेव लग्नं सुदिनं तदेव ताराबलं चंद्रबलं तदेव ॥ विद्याबलं दैवबलं तदेव लक्ष्मीपते तेंऽघ्रियुगं स्मरामि ॥ लाभस्तेषां जयस्तेषां कुतस्तेषां पराजयः ॥ येषामिंदिवरश्यामो हृदयस्थो जनार्दनः ॥ विनायकं गुरुं भानुं ब्रम्हाविष्णुमहेश्वरान् ॥ सरस्वतीं प्रणम्यादौ सर्व कार्यार्थ सिद्धये ॥ अभीप्सितार्थसिद्ध्यर्थं पूजितो यः सुरासुरैः ॥ सर्वविघ्नहरतस्मै गणाधिपतये नमः ॥ सर्वेष्वारंभकार्येषु त्रयस्त्रिभुवनेश्वराः ॥ देवा दिशंतु नः सिद्धिं ब्रम्हेशानजनार्दनाः ॥

श्रीमद्भगवतो महापुरुषस्य विष्णोराज्ञया प्रवर्तमानस्य अद्य ब्राह्मणः द्वितीये परार्द्धे विष्णुपदे श्रीश्वेतवाराहकल्पे वैवस्वतमन्वंतरे कलियुगे प्रथमचरणे अष्टाविंशतितमे युग बौद्धावतारे भरद्वर्षे भारतखंडे जंबूद्वीपे दंडकारण्यदेशे गोदावर्याः दक्षिणेतीरे शालिवाहनशके इषुपात्रामक्षेत्रे अस्मिन्वर्तमाने व्यावहारिके अमुक नामसंवत्सरे अमुक अयने अमुक ऋतौ अमुक मासे अमुक पक्षे अमुक तिथौ अमुक वासरे अमुक नक्षत्रे अमुक स्थिते वर्तमाने चंद्रे अमुक महानक्षत्रे अमुक स्थिते श्रीसूर्ये अमुक स्थिते देवगुरौ शेषेषु ग्रहेषु यथायथाराशिस्थानस्थितेषु सत्सु शुभनामशुभकरण एवंगुणविशेषण विशिष्टायां शुभपुण्यतिथौ मम आत्मनः श्रुतिस्मृतिपुराणोक्तफलप्राप्त्यर्थं अमुक गोत्र अमुक शर्माहं अमुक फलावाप्तये अमुक कर्म करिष्ये "

म्हणून पाणी सोडावें. यांत चालू वर्षाचें नांव दक्षिणायन किंवा उत्तरायणाचें अयन, ऋतु, महिना, शुक्ल किंवा कृष्ण पक्ष, तिथी, वार, नक्षत्र, राशीचा चंद्र, चालू महानक्षत्र, कर्मकाळी राशीचा सूर्य, कर्मकाळी राशीचा गुरु, गोत्र, नांव, कर्मफल कोणतें तें फल, कर्मफल इत्यादींचा उच्चार करावा. नसेल तर करूं नये. नंतर श्रीगणपती पूजन

करावें. तांदुळावर सुपारी ठेवून (श्रीगणपती देवता म्हणून) त्याची षोडशोपचारे पूजा करावी व गूळ-खोबरे नैवेद्य दाखवून नंतर पाणी घेऊन ते खालील मंत्र म्हणून ताम्हणांत उदक सोडावे व नमस्कार करावा.

**वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटी समप्रभ ।**
**निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा ॥**
**श्रीमहागणपतयेनमः निर्विघ्नं कुरु ।**

नंतर पूजेसाठीं स्वच्छ थंड पाण्याचा तांब्या घेतलेला असेल त्यावर उजवा हात ठेवून मंत्र म्हणावें—

**कलशस्य मुखे विष्णुः कंठे रुद्रः समाश्रित।**
**मूले तत्र स्थितो ब्रम्हा मध्ये मातृगणा स्मृताः ॥**
**कु क्षौ तु सागराः सर्वे सप्तद्वीपा वसुंधरा ।**
**ऋग्वेदोऽथ यजुर्वेदः सामवेदोह्यथर्वणः ॥**
**अङ्गैश्च सहिताः सर्वे कलशं तु समाश्रिताः ।**
**अत्र गायत्री सावित्री शान्तिः पुष्टिकरी तथा ॥**
**आयांतु देवपूजार्थं दुरितक्षयकारकाः ।**
**गंगे च यमुने चैव गोदावरी सरस्वति ॥**
**नर्मदे सिंधु कावेरि जलेऽस्मिन संनिधिं कुरु ॥**
**कलशदेवतायै नमः । सर्वोपचारार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि ॥**

असें म्हणून तांब्याला गंधाक्षता-पुष्प वाहणें.

**शंखादौ चंद्रदैवत्यं कुक्षौ वरुणदेवता ।**
**पृष्ठे प्रजापतिश्चैव ह्यग्रे गंगासरस्वाति ।**

त्वं पुरा सागरोत्पन्नो विष्णुना विधृतः करे ।
निर्मितः सर्वदेवैस्तु पांचजन्य नमोऽस्तुते ॥
शंखदेवताभ्यो नमः । सकलपुजार्थे गंधपुष्पं समर्पयामि ॥

असें म्हणून शंखाला गंध–पुष्प वाहणें.

आगमार्थंतु देवानां गमनार्थं तु रक्षसाम ।
कुर्वे घण्टारवं ह्यत्र देवताव्हानलक्षणम् ॥
घंटायै नमः । सकलपुजार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि ॥
घंटानादं कुर्यात् ।

असें म्हणून घंटेला गंध–अक्षता–पुष्प वाहणें व घंटा वाजवावी.

अपवित्रः पवित्रो वा सर्वावस्थां गतोऽपि वा ।
यः स्मरेत् पुण्डरीकाक्षं स बाह्याभ्यन्तरं शुचिः ॥
पूजाद्रव्याणि संप्रोक्ष्य । आत्मानं च प्रोक्षेत ।

असें म्हणून पूजा केलेल्या तांब्यांतील पाणी पळीनें घेऊन तुळशीपत्रानें अगर फुलानें पूजासामुग्रीवर व आपल्या अंगावर शिंपडावें व पुढील मंत्र म्हणून पंचायतन देवतांना नमस्कार करून अंतःकरणांत ध्यान करावें.

## ध्यानमंत्र

शांताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशं
विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभांगम् ।
लक्ष्मीकांतं कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यं
वंदे विष्णुं भवभयहरं सर्वलोकैकनाथम् ॥ १ ॥

ध्यायेन्नित्यं महेशं रजतगिरिनिभं चारुचंद्रावतंसं
रत्नाकल्पोज्ज्वलांगं परशुमृगवराभीतिहस्तं प्रसन्नम्
पद्मासीनं समंतात्स्तुतममरगणैर्व्याघ्रकृत्तिंवसानं
विश्वाद्यं विश्ववंद्यं निखिल भयहरं पंचवक्त्रं त्रिनेत्रं ॥ २ ॥

गजवदनमचिन्त्यं तीक्ष्णदंष्ट्रं त्रिनेत्रं
बृहदुदरमशेषं भूतिराजं पुराणम् ।
अमरवरसुपूज्यं रक्तवर्णं सुरेशं
पशुपति सुतमीशं विघ्नराजं नमामि ॥३॥

ध्येयः सदा सवितृमण्डल मध्यवर्ती
नारायणः सरसिजासन संनिविष्टः ।
केयूरवान् मकरकुण्डलवान् किरीटी
हारी हिरण्मयवपुर्धृतशंखचक्रः ॥ ४ ॥

नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः ।
नमःप्रकृत्यै भद्रायै नियताः प्रणताः स्मताम ॥ ५ ॥

असें ध्यानमंत्र म्हणून सर्व देवतांच्या मूर्ति स्वच्छ धुवून एका ताम्हनांत ठेवाव्या व षोडशोपचार पूजा करावी. जी देवता असेल त्या देवतेचें नाम घ्यावें. उदा० ( श्रीभवानीशंकर प्रमुख पंचायतन ) **देवताभ्योनमः** फक्त त्या नांवापुढें **देवताभ्योनमः** असें म्हणावें.

आगच्छ देवदेवेश तेजोराशे जगत्पते ।
क्रियमाणां मया पूजां गृहाण सुरसत्तम ॥ १ ॥
आवाहनं समर्पयामि ॥

असें म्हणून आवाहनार्थ अक्षता वाहाव्या. शालिग्रामावर अक्षता न वाहता तुळसीपत्र वाहावें.

नानारत्नसमायुक्तं कार्तस्वरविभूषितं ।
आसनं देवदेवेश प्रीत्यर्थं प्रतिगृह्यताम् ॥ २ ॥
आसनं समर्पयामि ॥

असें म्हणून आसनार्थ अक्षता वाहावी.

पाद्यं गृहाण देवेश सर्वक्षेमसमर्थ भोः ।
भक्त्या समर्पितं देव लोकनाथ नमोऽस्तुते ॥ ३ ॥
पाद्यं समर्पयामि ॥

असें म्हणून पळीभर पाणी देवाच्या पायावर घालावें.

नमस्ते देवदेवेश नमस्ते धरणीधर ।
नमस्ते जगदाधार अर्घ्यं नः प्रतिगृह्यताम् ॥ ४ ॥
अर्घ्यं समर्पयामि

असें म्हणून पळीभर पाण्यांत गंध-अक्षता-फूल घालून तें पाणी देवाला घालावें.

कर्पूरवासितं तोयं मंदाकिन्याः समाहृतम् ।
आचम्यतां जगन्नाथ मया दत्तं हि भक्तितः ॥ ५ ॥
आचमनीयं समर्पयामि

असें म्हणून पळीभर पाणी देवास घालावें.

गंगासरस्वती रेवापयोष्णीनर्मदाजलैः ।
स्नापितोऽसि मया देव तथा शांतिं कुरुष्व मे ॥ ६ ॥
स्नानं समर्पयामि ॥

असें म्हणून देवाला स्नानार्थ पाणी घालावें.

**पयो दधि घृतं चैव मधु शर्करया युतम् ।**
**पंचामृतेन स्नपनं प्रीयतां परमेश्वर ॥ ७॥**

असें म्हणून देवास दूध, दही, तूप, मध, साखर पांच अमृतसमान पदार्थ एकत्र करून पंचामृतानें स्नान घालावें. नंतर स्वच्छ पाणी घालून स्नान घालावे. त्यानंतर —

**विलेपनार्थे चंदनं समर्पयामि । पूजार्थे अक्षतां समर्पयामि । धूपं समर्पयामि । दीपं समर्पयामि । नैवेद्यं समर्पयामि । नमस्करोमि ॥**

असें म्हणून देवास गंध, फूल, तुळसीपत्र, हळद, कुंकू, अक्षता वाहून धूप दीप ओवाळून पंचामृताचा नैवेद्य दाखवावा व नमस्कार करावा. नंतर —

**उत्तरे निर्माल्यं विसृज्य । अभिषेकं कुर्यात् ।**

असें म्हणून देवावरील फुलें काढून उत्तरेकडे ठेवावी आणि सर्व देव पुन्हां स्वच्छ पाण्यानें धुवून ताम्हणांत अभिषेकासाठी ठेवावे. अभिषेक पंचामृताचा, दूध-साखरेचा करावा.

अभिषेक : **श्रीगणपति अथर्वशीर्ष, श्रीसूक्त, श्रीरुद्र, श्रीपुरुषसूक्त** जी देवता मुख्य असेल त्याप्रमाणें अभिषेक करावा. अभिषेक झालेवर पुन्हा स्वच्छ पाण्यानें स्नान घालून **आचमनीयं समर्पयामि** । म्हणून देवावर पाणी घालावें.

**प्रसीद भगवत् देव रत्नकांचननिर्मितम् ।**
**भद्रपीठं समाविश्य पूजामेतां गृहाण भो ॥**

नंतर स्वच्छ मूर्ति धुवून वस्त्रानें पुसून देव्हाऱ्यांत नियोजित आसनांवर ठेवाव्या.

सर्वभूषाधिके सौम्ये लोकलज्जानिवारणे ।
मयोपपादिते तुभ्यं वाससी प्रतिगृह्यताम् ॥ ७ ॥
वस्त्रार्थे अक्षतां समर्पयामि ॥

असें म्हणून वस्त्रार्थे अक्षता वाहाव्या किंवा वस्त्र अर्पण करावें.

देवदेव नमस्तेऽस्तु त्राहि मां भवसागरात् ।
ब्रह्मसूत्रं सोत्तरीयं गृहाण पुरुषोत्तम ॥ ८ ॥
उपवस्त्रार्थे अक्षतां समर्पयामि ॥

असें म्हणून अंगावरील वस्त्रार्थ अक्षता वाहाव्या.

हरिद्रा स्वर्णवर्णाभा सर्वसौभाग्यदायिनी ।
सर्वालंकारमुख्या हि देवि त्वं प्रतिगृह्यताम् ॥
हरिद्राचूर्णसंयुक्तं कुंकुमं कामदायकम् ।
सौभाग्यवर्धनं ह्येतद्देवी त्वं प्रतिगृह्यताम् ॥
श्रीदेव्यै नमः । हरिद्रा कुंकुमं च समर्पयामि ॥

असें म्हणून देवीला हळद-कुंकू वाहणें.

श्रीखंडं चंदनं दिव्यं गंधाढ्यं सुमनोहरम् ।
विलेपनं सुरश्रेष्ठ चंदनं प्रतिगृह्यताम् ॥ ९ ॥
विलेपनार्थे चंदनं समर्पयामि ॥

असें म्हणून देवाला चंदनाचें गंध लावावें.

अक्षतास्तण्डुलाः शुभ्राः कुंकुमेन विराजिताः ।
मया निवेदिता भक्त्या गृहाण परमेश्वर ॥
अक्षतां समर्पयामि ॥

असें म्हणून देवाला अक्षता वाहाव्या.

माल्यादीनि सुगंधीनि मालत्यादीनि वै प्रभो
मयाहृतानि पूजार्थं पुष्पाणि प्रतिगृह्यताम् ॥
करवीरैर्जाति कुसुमैश्चम्पकैर्बकुलैः शुभैः
शतपत्रैश्च कण्हारैरर्चयेत्परमेश्वरम् ॥ १० ॥
पुष्पाणि समर्पयामि ॥

असें म्हणून निरनिराळी सुवासिक फुलें देवांना वाहावी. शंकराला बेल वाहावा. विष्णूला तुळसीपत्र वाहावें. गणपतीला दुर्वा वाहाव्या.

वनस्पतिरसोद्भूतो गंधाढ्योगंध उत्तमः ।
आघ्रेयः सर्व देवानां धूपोऽयं प्रतिगृह्यताम् ॥ ११ ॥
धूपं समर्पयामि ॥

असें म्हणून उदबत्ती-धूप ओवाळावा. घंटा वाजवावी.

साज्यंच वर्तिसंयुक्तं वह्निनायोजितं मया ।
दीपं गृहाण देवेश त्रैलोक्यातिमिरापह ॥
भक्त्या दीपं प्रयच्छामि देवाय परमात्मने ।
त्राहि मां निरयाद् घोराद् दीपोऽयं प्रतिगृह्यताम् ॥ १२ ॥

असें म्हणून घंटानाद करीत नीरांजन ओवाळावें.

**नैवेद्यं गृह्यतां देव भक्तिं मे ह्यचलां कुरु ।**
**ईप्सितं मे वरं देहि परत्र च परां गतिम् ॥ १३ ॥**
**नैवेद्यं समर्पयामि ॥**

असें म्हणून नैवेद्य दाखवावा. नैवेद्यास दूध, साखर पेढे, इत्यादि पदार्थ एका स्वच्छ भांड्यांत घेऊन देमासमोर चौकोनी मंडल भूमीवर काढून त्यावर भांडे ठेवावें. हातांत तुळसीपत्र घेऊन त्यावर किंचित पाणी सिंचन करून आपलें डोळे मिटून त्या नैवेद्याचा एकेक घांस आपल्या उजव्या हातानें देवाला अर्पण करीत आहोंत, असा भाव निर्माण करावा व —

**प्राणाय नमः । अपानाय नमः । व्यानाय नमः । उदानाय नमः । समानाय नमः । ब्रह्मणे नमः ।**

असें मंत्र म्हणावें. नंतर —

**नैवेद्यमध्ये पानीयं समर्पयामि । उत्तरापोशनं समर्पयामि । हस्तप्रक्षालनं समर्पयामि । मुखप्रक्षालनं समर्पयामि ।**

असें म्हणून प्रत्येक मंत्रास पळीभर पाणी उजव्या हातावर घेऊन ताम्हणांत सोडावें. नंतर —

**करोद्वर्तनार्थे चंदनं समर्पयामि । अलंकारार्थे अक्षतां समर्पयामि । पूजार्थे पुष्पं समर्पयामि ।**

असें म्हणून गंध, अक्षता, फूल देवास वाहावें. नंतर —

**फलं समर्पयामि । नारिकेल फलं समर्पयामि ।**
**पुगीफल तांबुलं सुवर्णपुष्प दक्षिणां समर्पयामि ।**

**सर्वोपचारार्थे अक्षतां समर्पयामि ॥**

असें म्हणून, फळ, नारळ, विडा-सुपारी, दक्षणा, इत्यादि असेल त्यावर अक्षता वरील मंत्र म्हणून वाहाव्या. शेवटी सर्वार्थे अक्षता वाहाव्या. नंतर

**एकार्तीक्यं करिष्ये ।**

असें म्हणून आरती करावी. गणपती, देवी, शंकर, दत्तात्रय, विष्णू जी देवता असेल ती आरती म्हणावी. कापूर लावावा. नंतर मंत्रपुष्पांजली वाहणेंसाठी हातांत अक्षता-फूल घ्यावे व खालील मंत्र म्हणावें—

**ॐ यज्ञेन यज्ञयजयंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।
तेहनाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः संति देवाः ॥
ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे ।
स मे कामान् कामकामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणो ददातु ।
कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः ॥ ॐ स्वस्ति ।
साम्राज्यं, भौज्यं, स्वाराज्यं, वैराज्यं, पारमेष्ठ्यं, राज्यं, महाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्याईस्यात् सार्वभौमः सार्वायुष आंतादापराधात । पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकराळिती ॥ तदप्येष श्लोकोऽभिगीतो " मरुतः परिवेष्टारो मरुतस्याऽवसन् गृहे । आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद " इति ॥**

असें मंत्र म्हणून पुष्पांजली देवांना वहावी. नंतर—

**नमः सर्वहितार्थाय जगदाधारहेतवे ।
साष्टांगोऽयं प्रणामस्ते प्रयत्नेन मया कृतः ॥ १४ ॥
नमस्कारं समर्पयामि ।**

असें म्हणून देवासमोर साष्टांग नमस्कार घालावा.

यानि कानि च पापानि जन्मान्तरकृतानि च।
तानि तानि विनश्यन्ति प्रदक्षिण पदे पदे ॥१५॥
प्रदक्षिणां समर्पयामि।

असें म्हणून देवासमोर प्रदक्षिणा घालावी. आपल्या उजव्या हाताच्या बाजूनें वळून सभोंवार फिरावें म्हणजे प्रदक्षिणा होते. नंतर हातांत फूल किंवा तुळसीपत्र घेऊन खालील मंत्र म्हणावें.

रूपंदेहि जयंदेहि यशोदेहि द्विषोजही।
पुत्रांदेहि धनंदेहि सर्वकामांश्च देहिमे।
आवाहनं न जानामि न जानामि तवार्चनम्।
पूजां चैव न जानामि क्षमस्व परमेश्वर।
अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम।
तस्मात्कारुण्यभावेन रक्ष रक्ष परमेश्वर।
गतं पापं गतं दुःखं गतं दारिद्र्यमेव च।
आगताः सुखसंपत्तिः पुण्याच्च तवदर्शनात्।
मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं सुरेश्वर।
यत्पूजितं मया देव परिपूर्ण तदस्तु मे।
यदक्षरपदभ्रष्टं मात्राहीनं च भवत्।
तत्सर्वंक्षम्यतां देव प्रसीद परमेश्वर।
अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम।
तस्मात्कारुण्यभावेन रक्ष रक्ष परमेश्वर॥
अपराधसहस्राणि क्रियन्तेऽहर्निशं मया।
दासोऽयमिति मां मत्वा क्षमस्व परमेश्वर॥
यस्य स्मृत्या च नामोक्त्या पूजायज्ञ क्रियादिषु।
न्यूनं संपूर्णतां याति सद्यो वंदे तमच्युतम्॥

असें मंत्र म्हणून देवाला फूल-अक्षता अर्पण करावें.

**अनेन यथाज्ञानेन यथामिद्दितोपचारद्रव्यैः**
**कृतपूजनेन ( श्रीभवानीशंकर प्रमुख पंचायतन )**
**देवता प्रीयतां ॥ तत्सब्रह्मार्पणमस्तु ।**

असें म्हणून पाणी सोडावें. पूजा पूर्ण झाली.

REFBK-0022505
REFBK-0022505

# सार्थ श्रीगणपत्यथर्वशीर्षम्

## श्रीगणेशाय नमः ( शांतिमंत्रा )

ॐ भद्रं कर्णेभिः शुणुयाम देवाः भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः । स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिर्व्यशेम देवहितं यदायुः ॥ स्वस्ति न इंद्रो वृद्धश्रवाः स्वास्ति नः पूषा विश्ववेदाः । स्वस्ति नस्तार्क्ष्यो अरिष्टनेमिः स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ॥

ॐ नमस्तेगणपतये । त्वमेवप्रत्यक्षंतत्वमसित्वमेवकेवलंकर्तासि । त्वमेवकेवलंधर्तासि । त्वमेवकेवलं हर्तासि । त्वमेवसर्वंखल्विदंब्रह्मासि । त्वं साक्षादात्मासिनित्यं ॥ १ ॥ ऋतं वच्मि । सत्यं वच्मि ॥ २ ॥ अवत्वंमाम् । अववक्तारम् । अव श्रोतारम् । अवदातारम् । अवधातारम् । अवानूचानमवशिष्यम् । अवापश्चात्तात् अवपुरस्तात । अवोत्तरात्तात् । अवदक्षिणात्तात् । अवचोर्ध्वात्तात् । अवधरात्तात् । सर्वतोमांपाहिपाहिसमंतात् ॥ ३ ॥ त्वंवाङ्मयस्त्वंचिन्मयः ॥ त्वमा नंदमयस्त्वंब्रह्ममयः त्वं सच्चिदानंदाद्वितीयोसि । त्वंप्रत्यक्षं ब्रह्मासि । त्वंज्ञानमयो विज्ञानमयोसि ॥ ४ ॥ सर्वं जगदिदं त्वत्तोजायते । सर्वं जगदिदं त्वत्तस्तिष्ठति । सर्वं जगदिदं त्वयिलयमेष्यति सर्वंजगदिदंत्वयि प्रत्येति । त्वंभूमिरापोऽनलोऽनिलोनभः । त्वंचत्वारिवाक्पदानि ॥ ५ ॥ गुणत्रयातीत । त्वदेहत्रयातीतः । त्वंकालत्रयातीतः । त्वंमूलाधारस्थितोसि नित्यम् । त्वंशक्तित्रयात्मकः । त्वांयोगिनोध्यायन्तिनित्यम् । त्वंब्रह्मात्वंविष्णुस्त्वं रुद्रस्त्वमिंद्रस्त्वमग्निस्त्वंवायुस्त्वंसूर्यस्त्वं-

चंद्रमास्त्वंब्रह्मभूर्भव: स्वरोम् ॥ ६ ॥ गणादिं पूर्वमुच्चार्यवर्णादिं तदनंतरम् अनुस्वारः परतरः । अर्धेन्दुलसितं । तारेणंऋद्ध । एतत्तवमनुस्वरुपम् । गकारः पूर्वरूपम् । अकारोमध्यमरूपम् । अनुस्वारश्चांत्यरूपम् । बिंदुरुत्तररूपम् । नाद.संधानम् । संहितासंधिः । सैषा गणेशविद्या । गणकऋषिः । निचृद्गायत्रीच्छंदः । गणपतिर्देवता । ॐ गंगणपतये नमः ॥ ७ ॥ एकदंताय विद्महे वक्रतुण्डाय धीमहि । तन्नो दंति प्रचोदयात् ॥ ८ ॥ एकदंतंचतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम् । रदचवरदं हस्तैर्बिभ्राणंमूषकध्वजम् । रक्तंलंबोदरं शूर्पकर्णकं रक्तवाससम् । रक्तगंधानुलिप्तांगंरक्तपुष्पैःसुपूजितम् । भक्तानुकंपिनंदेवं जगत्कारण मच्युतम् । आविर्भूतंचसृष्ट्याद्रौप्रकृतेः पुरुषात्परम् । एध्वंयायति यो नित्यं सयोगी योगिनांवरः ॥ ९ ॥ नमोव्रातपतये नमो गणपतये नमः प्रथमपतये नमस्ते अस्तुलंबोदरायैकदंतायाविघ्ननाशिनेशिवसुताय श्रीवरदमूर्तयेनमः ॥ १० ॥

एतदथर्वशीर्षंयोधीते । सब्रह्मभूयायकल्पते । ससर्वतः सुखमेधते । ससर्वविघ्नैर्नबाध्यते । सपंचमहापापात्प्रमुच्यते । सायमधीयानोदिवसकृतं पापं नाशयति । प्रातरधीयानोरात्रिकृतं पापंनाशयति । सायंप्रात:प्रयुंजानो अपापोभवती । सर्वत्राधीयानोपविघ्नो भवति । धर्मार्थकाममोक्षंचविंदति । इदमथर्वशीर्षमशिष्यायनदेयं । योयदि मोहाद्दास्यति सपापीयान् भवति । सहस्रावर्तनात् । यं यं काममधीते । तंतमनेनसाधयेत् ॥ ११ ॥ अनेनगणपतिमभिषिंचति । सवाग्मीभवति । चतुर्थ्यामनश्नन्जपति सविद्यावान्भवति । इत्यथर्वणवाक्यम् । ब्रह्माद्यावरणंविद्यात् । नबिभेतिकदाचनेति ॥ १२ ॥ योदूर्वांकुरैर्यजति । सवैश्रवणोपमो भवति । योलाजैर्यजति सयशोवान्भवति । समेधावान्भवति । योमोदकसहस्रेणयजति । सवांछितफलमवाप्नोति । यःसाज्यसमिद्भिर्यजति । ससर्वंलभते । ससर्वंलभते । अष्टौ ब्राह्मणान् सम्यग्ग्राहयित्वा । सूर्यवर्चस्वी भवति । सूर्यग्रहे महानद्यांप्रतिमासंनिधौवाजप्त्वा । सिद्धमंत्रो भवति । महाविघ्नात्प्रमुच्यते । महादोषात्प्रमुच्यते । महापापात्प्रमुच्यते । ससर्वविद्भवतिससर्वविद्भवति । यएवंवेद । इत्युपनिषत् ॥ १३ ॥ ॐ सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सहवीर्यं करवावहै तेजस्विनावधीमस्तु मा विद्विषावहै ।

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

# १०८ बेलपत्री वाहणेंची नांवे

१) ॐ शिवाय नमः
२) ॐ महेश्वराय नमः
३) ॐ शंभवे नमः
४) ॐ शशीशेखराय नमः
५) ॐ वामदेवाय नमः
६) ॐ विरुपाक्षाय नमः
७) ॐ नीललोहीताय नमः
८) ॐ शंकराय नमः
९) ॐ उग्राय नमः
१०) ॐ गंगाधराय नमः
११) ॐ शिवाप्रीयाय नमः
१२) ॐ अंबिकानाथाय नमः
१३) ॐ शूलपाणेय नमः
१४) ॐ खंडवाशिने नमः
१५) ॐ विष्णूवल्लभाय नमः
१६) ॐ भवाय नमः
१७) ॐ शर्वाय नमः
१८) ॐ शितीकंठाय नमः
१९) ॐ कालकालाय नमः
२०) ॐ कृपानिधये नमः
२१) ॐ जटाधराय नमः
२२) ॐ कैलासवासने नमः
२३) ॐ त्रिपूरांतकाय नमः
२४) ॐ वृषभासदाय नमः
२५) ॐ सांबप्रीयाय नमः
२६) ॐ सोमनाथाय नमः
२७) ॐ सदाशिवाय नमः
२८) ॐ भुंजगभुषणाय नमः
२९) ॐ गिरीप्रीयाय नमः
३०) ॐ मृत्युंजयाय नमः
३१) ॐ रुद्राय नमः
३२) ॐ दिगंबराय नमः
३३) ॐ पशुपतये नमः
३४) ॐ देवाय नमः
३५) ॐ महादेवाय नमः
३६) ॐ हराय नमः
३७) ॐ सहस्त्राक्षाय नमः
३८) ॐ सहस्त्रपदे नमः
३९) ॐ तारकाय नमः
४०) ॐ पिनाकिने नमः
४१) ॐ कपर्दिने नमः
४२) ॐ अदिर्बुध्न्याय नमः
४३) ॐ कपालिने नमः
४४) ॐ वृषाविपीने नमः
४५) ॐ स्थानवे नमः
४६) ॐ त्रिलोकेशाय नमः
४७) ॐ सोमाय नमः
४८) ॐ मल्लिकार्जुनाय नमः
४९) ॐ महांकालाय नमः
५०) ॐ भीमशंकराय नमः
५१) ॐ केदारनाथाय नमः
५२) ॐ ओंकारनाथाय नमः
५३) ॐ विश्वेश्वराय नमः
५४) ॐ त्र्यंबकेश्वराय नमः

चंद्रमास्त्वंब्रह्मभूर्भुवः स्वरोम् ॥ ६ ॥ गणादिं पूर्वमुच्चार्यवर्णादिं तदनंतरम् अनुस्वारः परतरः । अर्धेन्दुलसितं । तारेणंऋद्धं । एतत्तवमनुस्वरुपम् । गकारः पूर्वरूपम् । अकारोमध्यमरूपम् । अनुस्वारश्चांत्यरूपम् । बिंदुरुत्तररूपम् । नाद.संधानम् । संहितासंधिः । सैषा गणेशविद्या । गणकऋषिः । निचृद्गायत्रीच्छंदः । गणपतिर्देवता । ॐ गंगणपतये नमः ॥ ७ ॥ एकदंताय विद्महे वक्रतुण्डाय धीमहि । तन्नो दंति प्रचोदयात् ॥ ८ ॥ एकदंतंचतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम् । रदचवरदं हस्तैर्बिभ्राणंमूषकध्वजम् । रक्तंलंबोदरं शूर्पकर्णकं रक्तवाससम् । रक्तगंधानुलिप्तांगंरक्तपुष्पैःसुपूजितम् । भक्तानुकंपिनंदेवं जगत्कारण मच्युतम् । आविर्भूतंचसृष्ट्यादौप्रकृतेः पुरुषात्परम् । एवंध्यायति यो नित्यं सयोगी योगिनांवरः ॥ ९ ॥ नमोव्रातपतये नमो गणपतये नमः प्रथमपतये नमस्ते अस्तुलंबोदरायैकदंतायाविघ्ननाशिनेशिवसुताय श्रीवरदमूर्तयेनमः ॥ १० ॥

एतदथर्वशीर्षंयोधीते । सब्रह्मभूयायकल्पते । ससर्वतः सुखमेधते । ससर्वविघ्नैर्नबाध्यते । सपंचमहापापात्प्रमुच्यते । सायमधीयानोदिवसकृतं पापं नाशयति । प्रातरधीयानोरात्रिकृतं पापंनाशयति । सायंप्रातःप्रयुंजानो अपापोभवती । सर्वत्राधीयानोपविघ्नो भवति । धर्मार्थकाममोक्षंचविंदति । इदमथर्वशीर्षमशिष्यायनदेयं । योयदि मोहाद्दास्यति सपापीयान् भवति । सहस्रावर्तनात् । यं यं काममधीते । तंतमनेनसाधयेत् ॥ ११ ॥ अनेनगणपतिमभिषिंचति । सवाग्मीभवति । चतुर्थ्यामनश्नन्जपति सविद्यावान्भवति । इत्यथर्वणवाक्यम् । ब्रह्माद्यावरणंविद्यात् । नबिभेतिकदाचनेति ॥ १२ ॥ योदूर्वांकुरैर्यजति । सवैश्रवणोपमो भवति । योलाजैर्यजति सयशोवान्भवति । समेधावान्भवति । योमोदकसहस्रेणयजति । सवांछितफलमवाप्नोति । यःसाज्यसमिद्भिर्यजति । ससर्वंलभते । ससर्वंलभते । अष्टौ ब्राह्मणान् सम्यग्ग्राहयित्वा । सूर्यवर्चस्वी भवति । सूर्यग्रहे महानद्यांप्रतिमासंनिधौवाजप्त्वा । सिद्धमंत्रो भवति । महाविघ्नात्प्रमुच्यते । महादोषात्प्रमुच्यते । महापापात्प्रमुच्यते । ससर्वविद्भवतिससर्वविद्भवति । यएवंवेद । इत्युपनिषत् ॥ १३ ॥ ॐ सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सहवीर्यं करवावहै तेजस्विनावधीमस्तु मा विद्विषावहै ।

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

५५) ॐ वैजनाथाय नमः
५६) ॐ नागनाथाय नमः
५७) ॐ रामेश्वराय नमः
५८) ॐ घृणेश्वराय नमः
५९) ॐ शिपिविष्टाय नमः
६०) ॐ कंठाय नमः
६१) ॐ भक्तवत्सलाय नमः
६२) ॐ भर्गाय नमः
६३) ॐ कामारये नमः
६४) ॐ अंधकासुरसुदनाय नमः
६५) ॐ ललाटाक्षाय नमः
६६) ॐ मृगपालये नमः
६७) ॐ भीमाय नमः
६८) ॐ वृषांकाय नमः
६९) ॐ अविश्वराय नमः
७०) ॐ हविषे नमः
७१) ॐ पंचतंत्राय नमः
७२) ॐ परशुहस्त्राय नमः
७३) ॐ भष्मोधुलिनविग्रहाय नमः
७४) ॐ सर्वज्ञाय नमः
७५) ॐ परमात्मने नमः
७६) ॐ दुर्गारिध्वन्वेन नमः
७७) ॐ यक्षत्रयाये नमः
७८) ॐ पार्वतीपरमेश्वराय नमः
७९) ॐ पाशविमोचनाय नमः
८०) ॐ हरये नमः
८१) ॐ अव्यग्राय नमः
८२) ॐ अव्ययाय नमः
८३) ॐ भूपतये नमः
८४) ॐ अनेकात्मने नमः
८५) ॐ सात्विकाय नमः
८६) ॐ अजाय नमः
८७) ॐ मृडाय नमः
८८) ॐ पूष्पदंतभिदे नमः
८९) ॐ दक्षश्वरहराय नमः
९०) ॐ गिरीक्ष नमः
९१) ॐ जयतगुरवे नमः
९२) ॐ केशवाय नमः
९३) ॐ महासेवजनकाय नमः
९४) ॐ चारूविक्रमाय नमः
९५) ॐ विरभद्राय नमः
९६) ॐ गणनाक्षाय नमः
९७) ॐ प्रजापतये नमः
९८) ॐ हिरण्यनरसे नमः
९९) ॐ भरवाय नमः
१००) ॐ क्रांतीवासने नमः
१०१) ॐ सूक्ष्मतनये नमः
१०२) ॐ पुरातये नमः
१०३) ॐ जगतव्यापीने नमः
१०४) ॐ गोकर्णमहाबळेश्वराय नमः
१०५) ॐ खंडपरशवे नमः
१०६) ॐ सोमसुर्याग्नीलोचनाय नमः
१०७) ॐ अपवर्गाप्रियाय नमः
१०८) ॐ अनंताय नमः

卐 卐 卐